महत्त्वाचे

मिश्रा यांनी पटकाली दोन पदके

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– येथील अनुराधा मिश्रा यांनी नॅशनल पॉवर लिफ्टिंग ॲण्ड डेडलिफ्ट अनइक्युपेटेड चॅम्पियनशिप स्पर्धेत दोन सुवर्ण पदक पटकाविले. नुकतीच ही राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धा दिल्ली येथे पार पडली. यामध्ये ३० पेक्षा अधिक महिला स्पर्धक सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेत मिश्रा यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांची स्पेन येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत मिश्रा भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. दिल्ली रोहिणी येथील राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मिश्रा यांनी ६३ किलो वजनगटात त्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन सुवर्णपदकांची कमाई केली. मिश्रा यांना या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे, राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मिश्रा या सावेडी येथील जिम स्ट्राईकर मध्ये प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

कृषिदूतांचे वाळुंजमध्ये स्वागत

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– महात्मा फुले कृषि विद्यापीठ संलग्न डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालय, विळदघाट येथील चतुर्थ वर्षाचे विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरुकता व कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत वाळुंज गावात दाखल झाले. ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी वाळुंजच्या सरपंच पा. गो. हिंगे, उपसरपंच गायकवाड, तलाठी कराळे व ग्रामस्थ उपस्थित होते. कृषिदूत ग्रामीण कृषी जागरूकता आणि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमासाठी आलेले असून १० आठवडे चालणाऱ्या या कार्यक्रमात विविध प्रकारच्या प्रात्यक्षिकांची माहिती कृषिदूत देणार आहेत. कृषिदूत सुमित गोलेकर, अभिजीत गाडे, साहिल जाधव, ओम बंडाळे, शिवम भोर हे शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती देणार आहेत. गावामध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे ग्रामीण जीवनमान, सामाजिक व आर्थिक स्तर, नैसर्गिक साधन संपत्ती, समाजातील सामाजिक स्थिती, पीक पद्धती इ. विविध गोष्टीचा अभ्यास करणार आहेत. त्याच बरोबर विविध कार्यक्रम व प्रात्यक्षिक दाखविणार आहेत. माती व पाणी परीक्षण, विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान, जिवाणू खतांचा शेतीमध्ये वापर, गांडुळखत निर्मिती, पिकांवर येणारे रोग व किडी याची माहिती व व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन तसेच शेतीशी निगडित विविध समस्यांवरील उपाय, बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

वाटेफळमध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी संलग्न डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि महाविद्यालय, विळदघाट येथील चर्तुथ वर्षाचे विद्यार्थी ग्रामीण कृषि जागरुकता व कृषि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत वाटेफळ गावात दाखल झाले असून ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. कृषिदूत सौरभ यादव, प्रसाद पाटील, सिद्धांत पवार, अंगराज तारडे, सुजित उगले यांचा समावेश असून ते शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन तसेच आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती देणार आहेत. गावामध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे ग्रामीण जीवनमान, सामाजिक व आर्थिकस्तर, नैसर्गिक साधन संपत्ती समाजातील सामाजिक स्थिती, पीक पद्धती आदी विषयाचा अभ्यास करणार आहेत, तया बरोबर शेतकऱ्यांनाही विविध कार्यक्रम व प्रात्यक्षिक दाखविणार आहेत. माती व पाणी परीक्षण, विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान, जिवाणू खतांचा शेतीमध्ये वापर, गांडूळखत निर्मिती, पिकांवर येणारे रोग व किडी याची माहिती व व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन तसेच शेतीशी निगडित विविध समस्यांवरील उपाय, बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक अशा विविध विषयांवर शेतकरी बंधूंना मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. सोमेश्वर राऊत, कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण दांगडे, प्रा. पुनम ठोंबरे व इतर विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी सरपंच बाबासाहेब अमृते, उपसरपंच योगिता माने, ग्रामकृषी सहाय्यक अधिकारी ज्ञानेश्वर डुकरे व ग्रामस्थ उपस्थित होते.

तलवार घेऊन फिरणारा अटकेत

पाथर्डी (तालुका प्रतिनिधी) – पाथर्डी शहरातील माणिकदौंडी चौक येथे एक इसम धारदार तलवार हातात घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्याला पोलिसांनी अटक केली. राजू नामदेव सानप (वय ३५, रा. शिरसाटवाडी, ता. पाथर्डी) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत पोलिस स्टेशनचे पोलीस नाईक विनोद मासाळकर यांनी फिर्याद दिली असून, मंगळवारी (दि.१०) दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास पोलिस निरीक्षक यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, माणिकदौंडी चौकात एक इसम तलवार हातात घेऊन फिरत आहे आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करत आहे. या माहितीच्या आधारे पोलिस कर्मचारी पोलिस हेड कॉन्स्टेबल सुहास बटुळे, भगवान गरगडे, लक्ष्मण पोटे, कळमकर यांनी दोन पंचांना घेऊन घटनास्थळी धाव घेतली व सानपला अटक केली.

रांजणखळग्यात पडून तरुणाचा मृत्यू

पारनेर (तालुका प्रतिनिधी) – येथील रांजणखळगे पाहण्यासाठी आलेल्या शिवा दादाभाऊ ठाकरे (वय २८, रा. राहाडी, ता. येवला, जि. नाशिक) या तरुणाचा खडकावरून पाय घसरल्याने कुंडातील पाण्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाला. दोन दिवसांनी दि. १२ जूनला त्याचा मृतदेह कुंडात तरंगताना आढळून आला. यासंबंधीची शंकर दादाभाऊ ठाकरे (वय २९, रा. राहाटी, ता. येवला, जि. नाशिक) यांनी पारनेर पोलिसांत खबर दिली. पोलिस निरीक्षक समीर बारवकर, सहायक फौजदार शिवाजी कडूस यांनी १३ जूनला लोणावळा येथील शिवदुर्ग मित्र रेस्क्यू टीमच्या मदतीने खळग्यातील मृतदेह बाहेर काढला.

जिजाऊ स्मृती ज्योत रथयात्रा आज जामखेडमध्ये

जामखेड (प्रतिनिधी) – जिजाऊ स्मृती ज्योत रथयात्रा १४ जून ते १७ जून या कालावधीत पार पडणार असून आज सकाळी १० वाजता रथयात्रा जामखेड शहरात येणार आहे. सकल मराठा समाज व मराठा सेवा संघ, जामखेड यांच्यावतीने बीड रोड कॉर्नर या ठिकाणी जिजाऊ स्मृती ज्योत रथयात्रेचे पूजन होणार आहे, आणि तेथून शोभायात्रेस प्रारंभ होऊन बस स्टँड येथे सांगता होणार आहे. रथयात्रेच्या स्वागतासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. राष्ट्रमाता माँ जिजाऊंच्या ३५१ व्या पुण्यतिथीनिमित्त जिजाऊंचे जन्मस्थळ मातृतीर्थ सिंदखेडराजा ते समाधीस्थळ पाचाड (किल्ले रायगड) येथे यदुकुलभूषण राजे लखुजीराव जाधवराव तसेच परिसरातील लखुजीराजेंच्या वंशजांच्यावतीने जिजाऊ स्मृतिज्योत रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पाचाड येथील जिजाऊंच्या समाधीस्थळी पुण्यतिथीच्या दिवशी सिंदखेडराजा येथील पाच विहिरींच्या जलाने जिजाऊंच्या समाधीस जलाभिषेक करण्यात येणार आहे. दिनांक १४ जून रोजी सकाळी ८.३० वाजता मातृतीर्थ सिंदखेडराजा येथून रथयात्रेचे प्रस्थान होणार आहे.

साहेब, आम्ही शाळेत जाणार कसे?

विद्यार्थ्यांची प्रशासनाला आर्त हाक ; रस्ता खुला करण्याची मागणी

कर्जत (प्रतिनिधी) – साहेब, आम्ही शाळेत कसे जाणार? अशी आर्त हाक कर्जतमधील शाळकरी विद्यार्थ्यांनी प्रशासनाला दिली आहे. गुडघाभर पाण्यातून विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागत असून पाण्यामध्ये अनेक वेळा सर्पांचे दर्शन होत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी, कर्जत तालुक्यातील चिंचोली गावठाण ते मोरे वस्ती आणि खंडाळा येथील गोयकरवाडी या भागांना जोडणारा जुना रस्ता अनेक वर्षांपासून अत्यंत वाईट स्थितीत आहे. सन २०२२ मध्ये स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत तहसीलदार कार्यालयाकडे लेखी तक्रार अर्ज दिला होता. या अर्जावर कारवाई करत ऑक्टोबर २०२२ मध्ये तहसीलदारांनी रस्ता ग्रामस्थांना देण्यासाठी खुला करावा असा आदेश दिला होता.

आदेशाच्या अंमलबजावणीसाठी आलेल्या तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना काही स्थानिक नागरिकांनी विरोध करत वाद घालून काम थांबवले. तेव्हापासून आतपर्यंत महसूल प्रशासनाला हा रस्ता खुला करता आलेला नाही. या रस्त्याचा वापर महिला, शाळकरी विद्यार्थी, शेतकरी व वृद्ध व्यक्ती ये-जा करण्यासाठी पावसाळ्यात या रस्त्यावर गुडघाभर पाणी साचते आणि प्रवास जीवघेणा ठरतो. मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावर वेड्या-बाभळीच्या झाडांनी अडथळा निर्माण केला आणि रस्ता पूर्णपणे बंद झाला. अनेक महिला शेतातून परतताना या झाडांमध्ये अडकून पडल्या होत्या. पाठीमागून ट्रॅक्टर आल्यामुळे त्यांना घरी जाता आले.

शेतामध्ये जाणाऱ्या अनेक महिला या परिसरामध्ये खराब रस्त्यामुळे व पाण्यात पडून जखमी झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना शाळेत जाताना पाण्यात साप दिसल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले, आणि काही विद्यार्थ्यांना शाळा बुडवावी लागली. गुडघाभर पाण्यातून या विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागते. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला प्रचंड प्रमाणात वेड्या बाभळी आहेत. यामधून अनेक प्राणी रस्त्यावर येतात. रात्रीच्या वेळी अंधारात या रस्त्याने प्रवास करणे खूप धोकादायक झाले आहे.

यामुळे या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी अनेक वेळा महसूल प्रशासन आणि ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा केला असूनही अद्याप कुणीही दखल घेतलेली नाही. या भीषण परिस्थितीमुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

यावेळी विद्यार्थ्यांनी पाण्यात बसून घोषणाबाजी केली. राज्य सरकारने व महसूल मंत्र्यांनी अशा रस्त्यांबाबत कायदा करूनही त्याची अंमलबजावणी होत नाही, असे येथे दिसून येते. त्यामुळे प्रांताधिकारी व तहसीलदार या रस्त्यासाठी काय भूमिका घेतात, याकडे आता सर्व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. यावेळी योगेश मोरे, हर्षल मोरे, शेखर मोरे, अविनाश काका, शिवाजी मोरे, छगन केंदळे, देविदास केंदळे, रंगनाथ केंदळे, दशरथ गायकवाड, मारुती गायकवाड, सत्यशील मोरे, आजिनाथ आखाडे, भागवत आखाडे, अशोक आखाडे, तुकाराम उबाळे, भाऊसाहेब काकाळ यांच्यासह मोठ्या संख्येने महिला, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

> आम्हाला शाळेत जायचे आहे, पण रस्ता नसल्यामुळे आम्ही शाळा बुडवतोय. आम्हालाही तहसीलदार व्हायचे आहे. मात्र शाळा बुडाली तर अधिकारी कसे होणार? असे म्हणत आमचा रस्ता तात्काळ खुला करून द्यावा अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. त्याचवेळी महिलांनी देखील संतप्त प्रतिक्रिया देत, जर लवकरात लवकर रस्ता खुला केला नाही, तर आम्ही तहसील कार्यालयाबाहेर तीव्र आंदोलन करू, असा इशारा दिला आहे.

पाथर्डी नगरपरिषदेकडून ठेकेदारावर कारवाई

स्ट्रिट लाईटचे काम अखेर रद्द; खर्च वसूल करणार

पाथर्डी (तालुका प्रतिनिधी) – पाथर्डी नगरपरिषदेच्या हद्दीतील नवीन बसस्टँड ते अरिहंत हॉस्पिटल (शेवगाव रोड) या मुख्य मार्गावर सुरू असलेले स्ट्रिट लाईटचे काम दीड वर्षांपासून रखडल्याने अखेर नगरपरिषद प्रशासनाने ठेकेदार संस्थेवर कडक कारवाई केली आहे. मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या आदेशानुसार, संबंधित ठेकेदाराचा कार्यारंभ आदेश ६ जून २०२५ रोजी रद्द करण्यात आला असून, अनामत रक्कमेतून अपूर्ण कामाचा खर्च वसूल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

सदर काम डिसेंबर २०२३ मध्ये मंजूर करण्यात आले होते. सुमारे ८.८६ लाख रुपये किंमतीच्या या कामात जुन्या पोल्सचा पुनर्वापर करत नवीन पथदिवे बसवण्याची जबाबदारी ठेकेदाराकडे होती. कामासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. मात्र, दीड वर्ष उलटूनही केवळ पोल उभारण्यासाठी सिमेंट फाउंडेशनच करण्यात आले असून प्रत्यक्षात दिवे बसवलेले नाहीत.

पाथर्डी-शेवगाव रोडवरील स्ट्रीट लाईटचे पोल बसवण्यासाठी तयार करण्यात आलेले निकृष्ट दर्जाचे काँक्रीटचे फाउंडेशन. (छाया – नारायण पालवे)

स्थानिक नागरिकांनी फाउंडेशनचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून, ते तुटण्याच्या स्थितीत असल्याची तक्रार केली आहे. परिणामी, रात्रीच्या अंधारात अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांनी या कामातील दिरंगाईबद्दल तीव्र संताप व्यक्त केला असून, लवकरात लवकर नवीन ठेकेदार नेमून परिसरात प्रकाश व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

या कामाच्या दर्जाबाबत आणि विलंबाबाबत ठेकेदारास ३ जानेवारी २०२५ रोजी प्रथम नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, कोणतीही सुधारणा न झाल्याने दुसरी नोटीस देत ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात आली आहे. यापुढे सदर ठेकेदाराला नगरपरिषदेच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास अपात्र ठरवण्यात आले आहे. ही कारवाई अहिल्यानगर जिल्हा तांत्रिक बेरोजगार विविध सेवा सहकारी संस्था मर्या. यांच्याविरोधात करण्यात आली असून, ठरलेल्या कालावधीत काम पूर्ण करण्यात संस्थेचे अपयश ठळकपणे दिसून आल्याचे नगरपरिषदेच्या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

वनांचे श्लोक लोकांपर्यंत पोहोचवा

डॉ. शेषराव पाटील : पर्यावरणविषयक पुस्तकाचे प्रकाशन

पारनेर (तालुका प्रतिनिधी) –मनाचे श्लोक सांगून रामदास स्वामी यांनी मनःस्थिती बलवान केली तर पर्यावरणविषयक घोषवाक्ये या पुस्तकातून वनांचे श्लोक मांडून वनाधिकारी रामदास पुजारी यांनी वसुंधरा सुस्थितीत ठेवण्याचा संदेश लोकांपर्यंत पोहचविण्याचा परिपूर्ण प्रयत्न केला आहे. वसुंधरा चांगली राहिली तर मानवी जीवन उत्तम राहिल, असे प्रतिपादन सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. शेषराव पाटील यांनी केले.

पुस्तकाचे प्रकाशन पुणे येथील वनभवनात करण्यात आले. पुण्याचे मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रविण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी उपवनसंरक्षक पंकज कुमार गर्ग, विभागीय वनाधिकारी राम धोत्रे, माजी मुख्य वनसंरक्षक रंगनाथ नाईकडे, रवी वानखडे, नानासाहेब लडकत, माजी विभागीय वन अधिकारी यशवंत पाटील, बबनराव हगवणे, मनोहर सैंदाणे, सहायक वनसंरक्षक दीपक पवार, बोंगाळे, लेखक, कवी व माजी सहायक वनसंरक्षक रामदास पुजारी, प्रा. विजय लोंढे, कवी लक्ष्मण शिंदे व साहित्यविश्व प्रकाशनचे संस्थापक विक्रम मालन, आप्पासाहेब शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन लेखक प्रा. विजय लोंढे यांनी केले. आभार प्रकाशक विक्रम शिंदे यांनी मानले.

शेवगाव आगाराला मे महिन्यात ६ लाख ४७ हजारांचा नफा

शेवगाव (तालुका प्रतिनिधी) – मराठवाड्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेवगाव आगाराने यंदा मे महिन्यात विक्रमी कामगिरी केली आहे. ३ कोटी ३३ लाख रुपये उत्पन्न मिळाले असून ६ लाख ४७ हजार रुपये एवढा नफा आगाराने कमविला आहे, अशी माहिती आगार व्यवस्थापक अमोल कोतकर यांनी दिली.

मे महिन्यात लग्नसराई, शाळा-महाविद्यालयांना उन्हाळी सुट्टी तसेच विविध धार्मिक यात्रांचा हंगाम असतो. या महिन्यात प्रवाशांचा बसमध्ये बसण्याकडे कल असतो. त्यामुळे शेवगाव आगाराने छत्रपती संभाजीनगर, गेवराई, अहिल्यानगर, नाशिक, पुणे या मार्गावर विशेष एसटी बस सेवा सुरु ठेवल्या होत्या. शेवगाव आगारास दहा नवीन (भारत स्टेज) बसेस मिळाल्यामुळे पुणे, नाशिक, मुंबई, छत्रपती संभाजीनगर अशा लांब, मध्यम लांब पल्ल्याच्या बसमध्ये वाढ केली. या मार्गावरील प्रवाशांनी चांगला प्रतिसाद दिल्याने या महिन्यात आगाराला ३ कोटी ३३ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. त्यात आगाराने ६ लाख ४७ हजार रुपयांचा नफा कमविला. यासाठी ५ लाख ६१ हजार किमी अंतर बसने पार करून ४ लाख ७३ हजार प्रवाशांनी शेवगाव एसटी बसेसची सेवा घेत प्रवास केला. त्यामध्ये ७५ वर्षांवरील अमृतजेष्ठ प्रवाशी – १३ लाख ३ हजार ६००, महिला प्रवाशी १५ लाख ९८ हजार ०६, ६५ वर्षांवरील ज्येष्ठ प्रवाशी १५ हजार ६६, इतर सवलत प्रवाशी – १३ हजार ६६८ तसेच तांत्रिक शिक्षण घेणारे विद्यार्थी ३३४ अशा प्रवाशांनी बसचा लाभ घेतला.

शेवगाव आगारास विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, यंत्र अभियंता अविनाश साखरे, विभागीय वाहतूक अधिकारी चंद्रकांत चौधरी, पालक अधिकारी संकेत राजहंस, सुरक्षा अधिकारी धर्मराज पाटील यांनी मार्गदर्शन केले.

दरम्यान, आषाढी एकादशी निमित्त २५ जूनपासून शेवगाव आगारामधून पंढरपूरसाठी विशेष बसेस सोडण्यात येणार आहेत. तालुक्यातील कोणत्याही गावातून ४४ भाविकांचा ग्रुप उपलब्ध असल्यास, तेथून पंढरपूर दर्शनासाठी बस उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती आगार व्यवस्थापक अमोल कोतकर यांनी दिली.

नगरकरांची पावसाच्या पाण्याच्या त्रासापासून सुटका होणार

आ. जगताप : शहरातील भुयारी गटार कामाची पाहणी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– गेल्या गणेशोत्सवात जिल्हा वाचनालय ते अमरधाम, गौरीघुमट या परिसरात भुयारी गटार व रस्ता काँक्रीटीकरणाचे काम सुरू केले. प्रत्यक्षात कामास सुरूवात होऊन रस्त्याची खोदाईही झाल्यावर याभागातील काही उंदर घुशींची पळापळ येथून सुरू झाली. त्यांचा या व्यर्थ लुडबुडीकडे दुर्लक्ष करून हे काम दर्जेदार व्हावे, यासाठी मी विशेष लक्ष देणार आहे. यापुढे नगरकरांची पावसाच्या पाण्यापासून मुक्तता होणार असल्याचा विश्वास आ.संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.

राज्य सरकारकडे पाठपुरावा करत मंजूर करून आणलेल्या १५० कोटी रुपयांच्या निधीतून सध्या सुरु असलेल्या जिल्हा वाचनालय ते अमरधाम व गौरी घुमट या परिसरातील भुयारी गटार व रस्ता कामाची पाहणी शनिवारी सकाळी आ.जगताप यांनी केली. यावेळी महानगरपालिकेचे प्रशासक यशवंत डांगे, या भागातील सर्व माजी नगरसेवक व महायुतीतील पक्षांच्या पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आ.जगताप यांनी उपस्थित महानगरपालिकेच्या अधिकारी, रस्त्यांचे काम करणाऱ्या ठेकेदारा सूचना केल्या. यावेळी आ. जगताप म्हणाले, मोठा पाउस झाल्यावर शहरातील इतर भागातील पाणी मोठ्याप्रमाणात याच भागातून जात असल्याने नागरिकांना गाळ व चिखलामुळे मोठ्या त्रासला सामोरे जावे लागत असे. हा गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी मी पुढाकार घेत प्रत्यक्षात कामास सुरवात केली आहे. माजी उपमहापौर गणेश भोसले, किशोर डागवाले, गणेश कवडे, अजय चितळे, प्रकाश भागानगरे, सागर गोरे, मनापा शहर अभियंता मनोज पारखे, उपअभियंता श्रीकांत निंबाळकर, आदित्य बल्लाळ गणेश गाडळकर आदींसह महायुतीतील पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रहार अपंग क्रांती संघटनेचे कचेरीसमोर आंदोलन

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा म्हणून प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्रहार अपंग क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे, विनोद परदेशी, मधुकर घाडगे, लक्ष्मीताई देशमुख, हमीद शेख, संदीप शेंडकर, शिकारे सर, राजेंद्र पोकळे, सिराज शेख, बंडू लबडे, ज्ञानदेव कोळ, नितीन भन्साळी, रोहिणी करंडे, योगेश लबडे, सलीमभाई शेख, दादासाहेब शेजुळ, अशोक खेडकर, अरविंद नरसाळे, कांता सरडे, कमल सरोदे आदीसह अपंग बांधव व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी कष्टकरी कामगार दिव्यांग महिला व अन्य वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ८ जूनपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला बळ देण्यासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

जिल्ह्यात खरिपाची १५ टक्के पेरणी

४६.३ मिलीमीटर पावसाची नोंद ; वापसा न मिळाल्याने पेरणी रखडली

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – यंदा मान्सूनपूर्व पावसाने मे महिन्यात जोरदार हजेरी लावली. जमिनी उफाळून आल्या एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला होता. त्यानंतर कृषी विभागाने पेरण्याची घाई करू नका, असे आवाहन केले तरी या जिल्ह्यात शेतकऱ्यांनी १ लाख ५ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी केली आहे. आतापर्यंत १५ टक्के पेरणी झाली असून जून महिन्याच्या १३ दिवसात ४६.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. बहुतांशी ठिकाणी वापसा न मिळाल्याने अद्यापही पेरणी रखडली आहे.

मे महिन्यात झालेल्या पावसामुळे जिल्ह्यात अजूनही खरीप हंगामातील पेरणीच्यादृष्टीने पुर्वमशागतीचे काम सुरू आहे. या मान्सूनपूर्व पावसामुळे अजूनही शेतामध्ये पाणी-पाणी आहे. काही गावांमध्ये माती वाहून गेल्याने शेतकऱ्यांना पेरणी करणे अवघड झाले आहे. विशेषतः नगर तालुक्यातील दक्षिण भाग, शेवगाव, जामखेड, श्रीगोंदा, पारनेर या भागात अतिवृष्टी व ढगफूटीसदृश्य पाऊस झाल्याने अजूनही जमिनीमध्ये पाणी आहे. त्यामुळे या ठिकाणी पेरण्या लांबल्या आहेत. काही भागात पेरण्या सुरू झाल्या आहेत. त्यात उत्तर नगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगाव, राहुरी या भागात पेरण्या सुरू झाल्या आहेत. यंदा खरीपासाठी ६ लाख ९३ हजार ३४२.३५ हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून आतापर्यंत १ लाख २३९ हेक्टर क्षेत्रात खरीप हंगामातील विविध पिकांची पेरणी झाली आहे. अकोले तालुक्यात रोपवाटीका प्रक्षेत्रावर ४९०.० हेक्टर क्षेत्रावर भात रोप तयार करण्यात आली आहेत. तर यंदा १८ हजार ७४० हेक्टर क्षेत्रावर भाताचे नियोजन केलू असून १.० क्षेत्रावर भाताची लागवड झाली आहे.

पिकनिहाय झालेली पेरणी

- बाजरी ८ हजार २५१.३० हेक्टर, मका ८ हजार ५४२.४० हेक्टर, तूर १० हजार ७२६, मूग १४ हजार ९६३ हेक्टर, उडीद २५ हजार २१ हेक्टरवर, सोयाबीन १९ हजार ६२७, तर कापूस १२ हजार ९२६ हेक्टर लागवड झाली आहे.

वारकरी संप्रदायाचे कार्य महान

वारकरी सेवा संघाच्यावतीने अधीक्षक घार्गे यांचा सत्कार

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – महाराष्ट्राला संतांची आणि वारकरी संप्रदायाची महान परंपरा लाभली आहे. हा संप्रदाय संपूर्ण जगाला मानवतेचा, सहिष्णुतेचा आणि समतेचा संदेश देतो. वारकरी संप्रदायाचे कार्य हे केवळ धार्मिक नसून सामाजिक एकतेचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन नगरचे नूतन पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

जिल्हा वारकरी सेवा संघाच्यावतीने घेण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचा अध्यक्ष हभप विश्वनाथ अण्णा राऊत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात वारकरी संप्रदायाच्या कार्याची, त्याच्या सामाजिक योगदानाची आणि पोलीस प्रशासनाच्या सहकार्याची सांगड घालण्यात आली. यावेळी अधीक्षक घार्गे म्हणाले, वारकरी संप्रदाय हे एक प्रबळ आध्यात्मिक आणि सामाजिक चळवळ आहे. या चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्राने अनेक संत आणि विचारवंत दिले, ज्यांनी समाजाला एकात्मतेचा मार्ग दाखवला. सेवा संघाचे अध्यक्ष हभप विश्वनाथ राऊत यांनी संघाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. लवकरच येणाऱ्या आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर नगर शहरातून जाणाऱ्या दिंड्यांच्या सुव्यवस्थेबाबतही चर्चा झाली. प्रशासनाच्या मदतीने दिंडी मार्ग, वाहतूक नियंत्रण, वीज व पाण्याच्या सोयी यांचा आढावा घेण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.